मुंबईसह ठाणे-रायगडमध्ये येणार उष्णतेची लाट

उकाडा वाढत चालल्यामुळे नागरिक हैराण

■ प्रतिनिधी, मुंबई

राज्यामध्ये उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. वाढते तापमान आणि उकाडा वाढत चालल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशामध्ये सरकारकडून वारंवार नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करत आहेत. अशामध्ये मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. हवामान खात्याकडून उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, मुंबईत आज ३८

अंश सेल्सिअस पेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली आहे. रविवारी देखील मुंबईत, ठाणे, रायगड भागात अधिक तापमानाची नोंद झाली. तापमान सरासरीपेक्षा ४.८ अंशांनी वाढ झाली आहे. एप्रिल महिन्यात सलग दुसऱ्यांदा उष्णतेची लाट येण्याचा हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे. मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

सकाळी ११ ते दुपारी ३ वाजतापर्यंत दरम्यान घराबाहेर पडू नये. उन्हाषमध्ये जाणे टाळावे.जास्तीत जास्त पाणी प्यावे. सुती कपडे घालावीत, असे आवाहन केले जात आहे. वाढत्या तापमानामुळे राज्यात उष्माघाताचे रुग्ण वाढले आहेत. त्याचसोबत अनेकांना चक्कर येणे, अशक्तपणा यासारखा त्रास होत आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे देखील सांगितले जात आहे.

दरम्यान, राज्यात मुंबई, ठाणे, कोकण परिसरात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक ठिकाणी हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तापमान चांगलेच वाढले आहे. याठिकाणचे कमाल तापमान ४० अंशापार पोहचले आहे.

मुंबईमध्ये देखील तापमान वाढले आहे. मुंबईत सध्या ३८ अंशाहून जास्त तापमान नोंदवले गले आहे. रविवारी सोलापूर येथे सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून त्याठिकाणचे तापमान ४३.७ अंश सेल्सिअसवर पोहचले होते. वातावरण बदलामुळे तापमान वाढले आहे.

शॉर्ट न्युज

सीएसएमटीजवळ लोकलचा डबा घसरल्याने हार्बर रेल्वे सेवा ठप्प

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे प्लॅटफॉर्म २ मध्ये प्रवेश करत असताना पनवेल- सीएसएमटी लोकल ट्रेनचा डबा रुळावरून घसरल्याने काल हार्बर मार्गावरील सेवा ठप्प झाली होती. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जिवीतहानी झाली नाही. हार्बर लाईन सेवेतील व्यत्ययामुळे मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील लोकल सेवेवर मात्र कोणताही परिणाम झाला नव्हता अशी माहिती मध्य रेल्वेने दिली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकाजवळ काल सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास पनवेल- सीएसएमटी ट्रेनचा डबा घसरला. परिणामी, सीएसएमटी ते वडाळा दरम्यान हार्बर मार्गावरील रेल्वे सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. अर्ध्या तासासाठी सीएसएमटी स्थानकात जाणाऱ्या आणि येणाऱ्या सर्वच लोकल सेवा स्थगित करण्यात आल्या. लोकलचा वेग कमी असल्यामुळे कोणत्याही प्रवासाला दुखापत झाली नाही, अशी माहिती मध्य रेल्वेने दिली. महत्वाचे म्हणजे, हार्बर लाईन सेवेतील व्यत्ययामुळे मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील लोकल सेवेवर कोणताही परिणाम झाला नाही.

बेस्टमध्ये अंतर्गत कामासाठीही कंत्राटी पद्धत

कार्यालयीन कामकाजासाठी कंत्राटी कामगार घेण्याचा बेस्ट निर्णय !

■ प्रतिनिधी, मुंबई

कंत्राटी बसचालक व वाहक, विद्युत विभागात कंत्राटी कामगार मात्र आता बेस्ट उपक्रमाच्या कार्यालयीन कामकाजासाठी कंत्राटी कामगार घेण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे. बस डेपो, बस स्थानक, बांधकाम करणे, विभाग कार्यालयात काही फेर रचना करणे, नकाशा तयार करणे यासाठी ड्रफ्ट्समन म्हणून कंत्राटी कामगार घेण्याचा निर्णय बेस्टने घेतला आहे. त्यामुळे बेस्ट उपक्रमाची खासगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याची चर्चा बेस्ट उपक्रमातील कायमस्वरुपी कामगारांमध्ये सुरू आहे.

पाच हजार बसेस, ५० लाख

प्रवासी अशी बेस्ट उपक्रमाची १० वर्षांपूर्वी ख्याती होती; मात्र हळुवार बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीने पाय रोवण्यास सुरुवात केली. भाडेतत्वावरील बसेस, त्यानंतर कंत्राटी बसचालक व वाहक असा कंत्राटी पद्धतीचा बेस्टच्या परिवहन विभागात शिरकाव झाला. त्यानंतर बेस्ट उपक्रमाच्या विद्युत विभागातही कंत्राटी पद्धतीने कामगारांची एंट्री झाली. परिवहन विभागात कंत्राटी पद्धत, विद्युत विभागात कंत्राटी पद्धत यावरून बेस्ट उपक्रमावर चौफेर टीका झाली. मार्च २०२२ आधी होणाऱ्या बेस्ट समितीच्या बैठकीत कंत्राटी पद्धतीवरून बेस्ट प्रशासनाला टीकेला सामोरे जावे लागले; मात्र ही कंत्राटी पद्धत नाही, अशी ओरड अनेकदा बेस्ट उपक्रमाकडून करण्यात आली; मात्र आता, तर बेस्ट उपक्रमाच्या कार्यालयातल कंत्राटी पद्धतीची अंमलबजावणी होणार असल्याने बेस्ट उपक्रमाचे खासगीकरण, असा आरोप विरोधकांनी केला आहे.

ड्रफ्ट्समन कंत्राटी पद्धतीवर घेण्यासाठी बेस्ट उपक्रमाने निविदा मागवल्या आहेत. निविदा प्रक्रियेत पात्र कंत्राटदाराला अथवा कंपनीने अटीशर्तीनुसार ड्रफ्ट्समनचा पुरवठा करणे बंधनकारक असल्याचे बेस्ट उपक्रमाकडून सांगण्यात आले.

अभिजीत राणे

www.abhijeetrane.in

समुह संपादक

मुंबई मित्र | वृत्त मित्र

www.aryf.in | www.dhadakkamgarunion.in | www.livemumbaimitra.com

■ **धोका तर शरद पवारानाच आहे; फडणवीसांचे जोरदार प्रत्युत्तर!**

मोदींना पुन्हा निवडून देणे हे देशासाठी धोकादायक आहे असे वक्तव्य शरद पवार यांनी केले होते. या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवारांना प्रत्युत्तर दिले आहे. शरद पवारांसाठी तिसऱ्यांदा मोदी पंतप्रधान होणे हे धोकादायक आहे. त्यांची आणि त्यांच्या पक्षाची जी परिस्थिती आहे त्यासाठी हे धोक्याचे आहे. त्यामुळे पवारांनी जे म्हटले आहे ते वैयक्तिक म्हटले आहे. महाराष्ट्र आणि देशासाठी मोदींनी जे केले आहे ते सगळ्यांनी पाहिले आहे. त्यामुळेच तर त्यांना मते मिळत आहेत.' असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे. शरद पवारांच्या वक्तव्यातून त्यांची भिती स्पष्टपणे दिसते आहे. कारण मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर भ्रष्टाचाराने बरबटलेल्या पक्षांची मुख्य अडचण होणार आहे. त्यामुळेच भयभीत झालेले शरद पवार देशाला पुढे करून स्वत:ला वाचवण्यासाठीची केविलवाणी धडपड करत आहेत. अर्थात पवारांचे ऐकायला जनता काही वेडी नाही. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान तर मोदीच होणार आहेत.

रेल्वेच्या विविध प्रकल्पांसाठी पालिकेची; ४५० झाडांवर कुऱ्हाड?

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईमध्ये महापालिका आणि रेल्वेच्या प्रकल्पांसाठी तब्बल ४५० झाडांची कतल प्रस्तावित आहे. पूर्व मुक्त मार्गाचा सध्याचा सर्व्हिस रोड वाढवण्यासाठी ३८२ झाडे हटवावी लागणार आहेत. ३१६ झाडे कापली जाणार असून ६६ झाडांचे पुनरोपण केले जाणार आहे. तर गोरेगाव-बोरिवली सहाव्या मार्गिकेसाठी १३० झाडे, कांदिवली येथील लालजीपाडा प्रस्तावित पुलासाठी ४ झाडे तोडणे प्रस्तावित आहे.

मुंबईतील वृक्षसंपदा जतन व संवर्धन करण्यासाठी पालिकेकडून होत असलेल्या प्रयत्नांमुळे २०२३ मध्ये सलग तिसऱ्या वर्षी जागतिक वृक्ष नगरी'चा पुरस्कार पटकावून पालिका आपलीच पाठ थोपटून घेते असताना दुसरीकडे राष्ट्रीय हरित लवादाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासह पालिकेला शहरात कमी होत चाललेल्या हिरवळीसाठी नोटिसा बजावल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या विविध भागात सरकारी प्रकल्पांसाठी शेकडो झाडांच्या कतलीची माहिती समोर आली आहे.

पूर्व मुक्त मार्गावरील भक्ती पार्क ते जिजामाता चौकापर्यंतचा सर्विस रोड ४ किमीचा प्रस्तावित करण्यात आला आहे. दया शंकर मार्ग आणि मुंबई पोर्ट ट्रस्टदरम्यान हे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी पालिका ६२ कोटी रुपये खर्च करणार आहे. यापूर्वी या रस्त्याची देखभाल एमएमआरडीए करत होती. २०१५ मध्ये पूर्व मुक्त मार्ग एमएमआरडीएकडून पालिकेकडे सोपविण्यात आल्याने आता या मार्गाची जबाबदारी पालिकेवर आली आहे.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्यांचे काँक्रिटीकरण रात्री करा

अभियंत्यांना आयआयटीच्या तज्ज्ञांचा सल्ला

■ प्रतिनिधी, मुंबई

सिमेंट काँक्रीट आणि खडी वाहून आणणारी वाहने, रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांटमधील अंतर, शहातील वाहतूक कोंडी यांसारख्या अडचणी लक्षात घेता रस्ते काँक्रिटीकरणाची कामे शक्यतो रात्रीच्या वेळेस करा, असा सल्ला आयआयटीच्या तज्ज्ञांनी मुंबई पालिकेच्या अभियंत्यांना दिला आहे.

पालिकेने हाती घेतलेल्या रस्ते काँक्रिटीकरण प्रकल्पासाठी आयआयटीच्या सहकार्याने पालिकेच्या अभियंत्यांसोबत विचारमंथन करणारी कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त पालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर, आयआयटी मुंबईचे



स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. के. व्ही. कृष्णराव, उपायुक (पायाभूत सुविधा) उल्हास महाले, प्रमुख अभियंता (रस्ते आणि वाहतूक) मनीषकुमार पटेल तसेच संबंधित अधिकारी व रस्त्याच्या कामांसाठी नियुक्त केलेले अभियंते यावेळी उपस्थित होते. १५० हून अधिक अभियंते तसेच सल्लागार कंपन्यांच्या अभियंत्यांचा कार्यशाळेमध्ये सहभाग होता. यावेळी काँक्रीट रस्त्यात पडणाऱ्या भेगांची कारणे व उपाययोजना, यावर आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. सोलोमॉन देबर्ना यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. के. व्ही. राव यांनी रस्त्यावरील भेगांची दुरुस्ती व देखभालीसाठी पॉलिमर काँक्रीटसारख्या पर्यायांचा वापर करण्याची सूचना केली.

मुंबई उत्तर-पश्चिममध्ये 'वंचित'मध्ये धुसफूस

■ प्रतिनिधी, मुंबई

काही मतदारसंघांत कोणता उमेदवार द्यावा यावरून महाविकास आघाडी व महायुती अस्त असताना आता वंचित बहुजन आघाडीतही धुसफूस सुरू झाली आहे. उत्तर-पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार संजीव कलकोरी यांच्या जागी दुसरा उमेदवार दिल्याने त्यांनी अपक्ष लढण्याचा इशारा दिला आहे.

प्रकाश आंबेडकर यांना अंधारात ठेवून माझ्या जागेवर पक्षाने अन्य उमेदवार दिल्याचा माझा संशय आहे. प्रस्थापित पक्ष व स्थानिक नेत्यांनी माझ्याविरोधात केलेले हे कारस्थान आहे. भाजपच्या स्थानिक नेत्याला माझी उमेदवारी पचनी पडत नव्हती. त्याने भाजपच्या वरिष्ठांना हाताशी धरून त्यांना पोषक असलेल्या उमेदवाराला उमेदवारी मिळवून दिली, असा थेट आरोप कलकोरी यांनी पत्रकार परिषदेत केला. उमेदवार का बदलला हे जाणून घेण्यासाठी मी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधत आहे, मात्र कोणी माझा कॉलही घेत नाहीत, अशी तक्रार त्यांनी केली.

चिकन तंदुरीच्या वादात तरुणाचा खून

■ प्रतिनिधी, मुंबई

चिकन तंदुरीच्या वादातून मुंबईमध्ये एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमध्ये आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मुलुंडच्या किसननगरमध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी मुलुंड पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे. पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास सुरू आहे. या घटनेमुळे मुलुंड परिसरामध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील मुलुंड परिसरात रविवारी रात्री चिकन तंदुरी देण्यावरून झालेल्या वादातून एका तरुणाची रस्त्याच्या मधोमध निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेत आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला. याप्रकरणी मुलुंड पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करत पाच आरोपींना अटक केली. मुलुंड पोलिसांकडून आरोपींची चौकशी सुरू आहे.

४० वर्षांपासून रखडलेल्या रस्ता रुंदीकरणाच्या कामास सुरुवात!

पालिकेने पोलीस संरक्षणात सदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू केले तेव्हा शाखा प्रमुख सुनील मांडवे,सुभाष येशकर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

■ प्रतिनिधी, मुंबई

मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ आणि प्रभाग क्र. ११ मधील शनी मंदिर, चौगुले नगर ते नॅन्सी डेपो यामधील रस्ता गेल्या ४० वर्षे विकासापासून वंचित होता. सदर रस्त्याच्या मधोमध झोपड्या असल्याने रुंदीकरणासाठी मर्यादा येत होत्या. त्यामुळे प्रचंड प्रमाणात वाहतुकीच्या समस्या निर्माण होत होत्या. बससेवा सुरू करण्यात अडथळा निर्माण होत होता. परिणामी स्थानिकांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत सातत्याने येथील शिंदे सेनेचे स्थानिक आमदार प्रकाश सुर्वे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी बैठका घेतल्या. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पुढाकार घेत त्यांच्या दालनात बैठक आयोजित केली होती आणि गेली ४० वर्षे प्रलंबित असलेली समस्या अखेर मार्गी लागली. रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या झोपडीधारकांचा प्रश्न देखील महत्वाचा होता.त्यांना बोरीवली (प) पंडीत मल्हाराव कुलकर्णी येथील पी.ए.पी इमारतीत ३०० ची. फुटांची घरे देण्याचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी दिले. त्यामुळे बाधित झोपडपट्टीवासियांना हक्काचे छप्पर मिळाले. आज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसह पोलीस संरक्षण घेऊन सदर रस्ताच्या रुंदीकरणाचे काम सुरू केले.

मुलुंडमधील पुनर्विकास प्रकल्पाची सर्वत्र चर्चा !

पूर्वरंग हाऊसिंग सोसायटीची कमाल रहिवाशांनीच उभी केली २३ मजली इमारत

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई, उपनगरांत हाऊसिंग सोसायट्यांच्या पुनर्विकास करणे म्हणजे फार जिकरीचे काम. या घरांचा पुनर्विकास करायचा म्हणजे एखाद्या बिल्डरला हाताशी धरावे लागते, त्यानंतर हे बिल्डर्स त्यांच्या सोईनुसार नफेखोरीला केंद्रस्थानी ठेवून पुनर्विकास करतात. त्यामुळे अनेक ठिकाणी लोकांची निराशा होते. मात्र मुलुंडमध्ये लोकांनी एक भन्नाट प्रयोग पूर्णत्वास नेला आहे. कोणत्याही बिल्डरला हाताशी न धरता या लोकांनी स्वत:च घरांचा पुनर्विकास केला आहे. ज्यामुळे त्यांना अगोदरपेक्षा अधिक मोठी घरे मिळाली आहेत. सोबतच घरांच्या पुनर्विकासासाठी जेवढा पैसा लावला होता, तो संपूर्ण पैसा या लोकांनी अतिरिक्त घरे विकून परत मिळवला आहे.

मुलुंडमधील या आगळ्यावेगळ्या प्रयोगाची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे.

मुलुंडमधील पूर्वरंग कोऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीने स्वत:च्या घरांचा स्वत:च पुनर्विकास केला आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प करताना त्यांनी कसलेही कर्ज घेतलेले नाही. तसेच कोणत्या बिल्डरलाही कंत्राट दिलेले नाही. एकूण ५६ कुटुंबांनी सतत सात वर्षे मेहनत घेऊन कोणतेही कर्ज न घेता एकूण २३ मजली इमारत उभी केली आहे. या ५६ कुटुंबांनी एकदिलाने काम करून उभे केले आहेत. स्वत: कंत्राटदार नेमून हवी तशी इमारत उभी केली आहे. याच कारणामुळे कोणतेही कर्ज न घेता स्वत:च पुनर्विकास प्रकल्प पूर्णत्वास जाणारा हा पहिला प्रयोग ठरला आहे.

पूर्वरंग को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष मिलिंद महाडिक यांनी त्यांच्या या अभिनव प्रयोगाबाबत अधिक माहिती दिली आहे. या सोसायटीचे लोक बधीकाळी ३९० स्क्वेअर फुटाच्या घरात राहायचे.

चिकन शोर्मा खाऊन अनेकांना विषबाधा

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील गोरेगांव इथे एक धक्कादायक घटना घडली आहे. गोरेगांव पूर्व परिसरातील चिकन शोर्मा खाऊन १२ जणांना विषबाधा झाल्याची माहिती समोर येत आहे. गोरेगाव पूर्वेकडील संतोषनगरमध्ये ही घटना घडली आहे. विषबाधा झालेल्या सर्व जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एम डब्ल्यू देसाई रुग्णालयात विषबाधा झालेल्यांवर उपचार सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे. यामधील ९ जणांना उपचारानंतर डिस्चार्ज मिळाला आहे. तर तीन जणांवर अजूनही उपचार सुरू आहेत. स्वप्निल डहाणूकर, मुस्ताक अहमद आणि सुजित जयस्वाल या तिघांची प्रकृती अस्थिर आहे, असे सांगण्यात आले.

गोरेगाव पूर्वेकडील संतोष नगर येथील गोल्डन बार समोर सॅटेलाइट टॉवर येथे चिकन शर्मा खाल्ल्यामुळे एकूण बारा जणांना विषबाधा झाल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या सर्व विषबाधा झालेल्या व्यक्तींना गोरेगाव परिसरातील एम डब्ल्यू देसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

दिव्यांग शाळेतर्फे मतदान केंद्रांवरील सोई-सुविधांची जनजागृती

■ प्रतिनिधी, मुंबई

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर उपलब्ध करून दिलेल्या सोई-सुविधांची माहिती दिव्यांग मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि मतदानाबाबत जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. त्यानुसार मुंबई शहर जिल्ह्यातील दिव्यांगांसाठी कार्यरत शासनमान्यता प्राप्त दिव्यांग शाळांतर्फे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये २० मे रोजी मतदान होणार आहे. यात दिव्यांग मतदारांच्या मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी मुंबई शहराचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप' कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानुसार दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग शाळांतर्फे राबवण्यात आलेल्या उपक्रमात मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी, पालक यांच्यासमवेत मेळावे, बैठका, चर्चासत्र घेऊन जास्तीत जास्त संख्येने मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. तसेच मतदान जागृतीसाठी प्रभातफेऱ्या काढण्यात आल्या. प्रभातफेऱ्यांद्वारे दिव्यांग मतदारांनी मतदानाच्या दिवशी १०० टक्के मतदान करण्याबाबतचे आवाहन विद्यार्थ्यांतर्फे करण्यात आले.

दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये दिव्यांग व्यक्तींची गृहभेट घेऊन त्यांना मतदानादिवशी व्हीलचेअर, मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी वाहन सुविधा उपलब्धतेबाबत माहिती दिली.

PUBLIC NOTICE

SURESH UPADHYAY
ADVOCATE HIGH COURT
305/9, Shivkrupa Co-op, supadhyay4242@gmail.com
PMGP Colony, Mankhurd, Mumbai 400 043
9702994242 / 9321023551

Dated: 27th Day of April 2024

That **M/S SURYODAYA SRA CHS (PROP)** Through its CHIEF PROMOTOR namely **MR. MANOJKUMAR WAMAN WAGHMARE**, secretary namely **MR RAVINDRA KANIP MANE**, The treasurer namely **MR. RAJENDRA WAMAN WAGHMARE** has given part and parcel of plot of land Being C.T.S NO 7 (pt) OF VILLAGE BORLA TALUKA KURLA, PL LOKHANDE MARG, GOVANDI, M/EAST WARD, MUMBAI SUBURBAN DISTRICT (Hereinafter referred the said Property) has given for redevelopment under S.R.A Scheme to **M/S NEELKANTH INFRA**, Through its director/ promoter **MR. MAHESH RAMJI RAVARIYA** and **MR. RAMJI RATANSHI PATEL** having office at FLAT NO B-402, BEVERLY PARK, SECTOR 06, NERUL NODE III, S. O 19, MAHARASHTRA, 91-INDIA 400706 in case If any persons having any objection regarding the claim / right / interest in the said plot of land is proposed to be handed over to **M/S NEELKANTH INFRA**, Through its director/ promoter **MR. MAHESH RAMJI RAVARIYA** and **MR. RAMJI RATANSHI PATEL** in writing with the supporting documents within 21 days from the date of publication of this Public Notice, falling which the SAID PLOT OF LAND SHALL BE HANDED OVER IN THE FAVOUR OF **M/S NEELKANTH INFRA**, for redevelopment under Slum Act, shall ignore such claim and/or objection as waived and shall proceed to start redevelopment on the said plot of land by **M/S NEELKANTH INFRA** as afore-stated.

Place:- Mumbai
DATE: 30/4/2024

Yours Faithfully
ADV. SURESH UPADHYAY

Cni RESEARCH LIMITED

Regd. Office: A-120, Gokul Arcade, Sahar Road, Vile Parle (East), Mumbai - 400 057.
CIN No. : L45202MH1982PLC041643
Email id: chamatcar@chamatcar.com **Contact:** 022-49737861

EXTRACT OF FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31.03.2024 (Rs. in Lakhs)

	Particulars	Current Quarter ending 31-03-2024 (Audited)	Preceding 3 months ended 31-12-2023 (Un-audited)	Corresponding 3 months ended in the previous year 31-03-2023 (Audited)	Year ended 31-03-2024 (Audited)	Corresponding year ended in the previous year 31-03-2023 (Audited)
1	Total Income from Operations	310.34	158.12	46.05	1042.05	958.78
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#)	28.11	(20.25)	(50.73)	84.99	49.34
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items and/or Extraordinary items#)	28.11	(20.25)	(185.73)	84.99	(85.66)
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#)	26.63	(20.25)	(185.78)	83.51	(85.70)
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(15.26)	349.25	(325.93)	545.21	(248.37)
6	Equity Share Capital	1148.05	1148.05	1148.05	1148.05	1148.05
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	343.36	(152.38)	(152.38)	343.36	(152.38)
8	Earnings Per Share (of Re.1/- each) (for continuing and discontinued operations) -					
	1) Basic:	0.02	(0.02)	(0.16)	0.07	(0.07)
	2) Diluted:	0.02	(0.02)	(0.16)	0.07	(0.07)

Notes:

a) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings).

b) The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.

c) # - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

For and on behalf of the Board of Directors of
For Cni RESEARCH LTD.
Sd/-
KISHOR P OSTWAL
MANAGING DIRECTOR
DIN: 00460257

Place: Mumbai
Date: 29.04.2024